**'शोदो' म्हणजेच जपानी कॅलिग्राफी अर्थात सुलेखन ही जपानमधील हजारो वर्षांपासून चालत आलेली कला आहे. शोदो या शब्दाचा अर्थच मुळी 'लिहिण्याची पद्धत' असा आहे. जपानी लिपीप्रमाणेच शोदोचे उगमस्थान चिनी कॅलिग्राफीमध्ये आहे. शोदोमध्ये फक्त सुंदर, वळणदार व अलंकारिक अक्षरे काढणे अभिप्रेत नसून त्यामागे त्या कलाकाराच्या कल्पनाविष्कारापासून ध्यानधारणेपर्यंतच्या अनेक संकल्पना आहेत.**

वर्षा पेंडसे-जोशी

# शोदो
# जपानी अभिव्यक्ती

न्यू यॉर्कमधील मॅनहॅटन भागात असणाऱ्या जपान सोसायटीमध्ये जपानी कॅलिग्राफीची ओळख करून घेण्याचा योग जुळून आला आणि जपानी संस्कृतीचे एक स्वतंत्र दालनच उघडल्यासारखे वाटले. जपानी लिपी मुळातच अतिशय सुरेख आणि मोहक लिपी आहे. जपानी न जाणणाऱ्यांना ती सुंदर नक्षीसमान भासते तर, जाणणाऱ्यांसाठी ती शब्दांचे चित्ररूप असते! या शब्दांना ब्रशच्या साहाय्याने काळ्या, चमकदार शाईने अतिशय सफाईदार व सहज, प्रसंगी जाड किंवा अतिनाजूक वळणे देत कागदावर उमटवणे अतिशय कठीण आहे आणि त्याला प्रचंड सरावाची गरज असते. जपानमधील राष्ट्रीय पातळीवरील कॅलिग्राफी स्पर्धा गाजवलेल्या आमच्या इन्क्यो सेन्सेई (सेन्सेई म्हणजे शिक्षक) अतिशय उत्साही! वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून त्यांनी हातात धरलेला शोदोचा ब्रश अव्याहतपणे आजही तितक्याच ताजेपणाने अक्षरे कशी उमटवितो हे प्रत्यक्ष पाहणं, हा एक विलक्षण आनंददायी अनुभव होता!




चीनमधून जपानमध्ये आयात झालेली ही कला सुरुवातीस फक्त उच्च, राजकुलांपुरतीच मर्यादित होती. नंतर ती हळूहळू जनसामान्यांपर्यंत पोचली आणि आज जपानी चित्रकला, पुष्परचना (इकेबाना), बाहुल्या इत्यादी कलाप्रकारांइतकीच लोकप्रिय कला आहे. आजही शोदोची सुंदर भेटकार्डे नववर्षासारख्या आनंदाच्या प्रसंगी दिली-घेतली जातात.

पारंपरिक शोदोसाठी लागणाऱ्या मूलभूत साहित्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

- शिताजिकी : काळ्या रंगाचे, मऊसर कापड. यावर सुलेखन करायचा कागद ठेवायचा असतो जेणेकरून शोदो लिखाण करण्यास एक सपाट, सलग पृष्ठभाग मिळेल.
- बुन्चिन : कागद सरकू नये म्हणून वर ठेवायची एक जड, धातूची पट्टी
- हान्शी : शोदोसाठी वापरला जाणारा खास जपानी पातळ कागद
- फुदे : फुदे म्हणजे ब्रश. यात मुख्यत्वे जाड ब्रश (मुख्य मजकूर लिहिण्यासाठी) आणि एक बारीक ब्रश (काम पूर्ण झाल्यावर लिहिणाऱ्याचे किंवा कवी/लेखकाचे नाव नमूद करण्यासाठी) असतात.
- सुझुरी : काळी शाई ठेवण्याचे काचेचे भांडे
- सुमी : कोळशापासून बनवलेली काळी शाई
- फुदेमाकी : ब्रश नेण्या-ठेवण्यासाठी बांबूपासून बनवलेली चटई
- फुदेमाकुराः कॅलिग्राफी करताना, वापरात नसलेला ब्रश ठेवण्याची खोबणी

**शोदोची नियमावली-**

जपानी कॅलिग्राफीचा सगळ्यात मूलभूत नियम म्हणजे, अक्षर फक्त एकदाच काढायचे! एकदा काढलेल्या अक्षरामध्ये खाडाखोड, फेरफार, दुरुस्ती केलेली अजिबात चालत नाही. तसेच, प्रत्येक अक्षर काढायची एक विशिष्ट पद्धत असते. त्याला stroke order असं म्हणतात. म्हणजेच एखाद्या अक्षरातल्या रेषांचा (strokes) क्रम हा ठरवून दिलेला आहे आणि त्यानुसारच ते अक्षर काढायचे असते. कॅलिग्राफीचा सराव चालू झाला तेव्हा ब्रश बोटाच्या चिमटीत कुठल्या कोनात पकडायचा इथपासून शिक्षण चालू झाले आणि त्यामागोमाग अगदी एकाच स्ट्रोकपासून बनलेल्या सोप्या अक्षरांपासून अनेक स्ट्रोक्स असणाऱ्या, क्लिष्ट अक्षरांपर्यंत गाडी हळूहळू जाऊ लागली. शोदोसाठी हात स्थिर असण्याबरोबरच मन विचारविरहित असणेही तितकेच आवश्यक असते. जाणकार नजरेस अस्थिर हात, मनाची चंचलता, एकाग्रतेचा अभाव, कॉन्फिडन्स नसणे इत्यादी सर्व गोष्टी शोदोतून बरोब्बर जाणवतात. शोदोमध्ये अक्षर काढताना हातावर नियंत्रण असणं या गोष्टीला फार महत्त्व आहे. कारण त्यानुसार अक्षर काढताना ब्रशवर कमी किंवा जास्त दाब द्यायचा असतो. कधीकधी ब्रशचे टोक किंचित अंशात गोल फिरवून (twist करून) पाहिजे तो परिणाम साधावा लागतो. अक्षरातील अमुक एखादा फराटा कुठपर्यंत ओढत न्यायचा, कुठे थांबवून ब्रश किंचित उचलायचा याकडे बारीक लक्ष द्यावे लागते. बरं हे सर्व साधताना कागदाचा आकार व अक्षराचा आकार या दोन्हींच्या प्रमाणाकडे लक्ष द्यावे लागते. शोदोच्या कागदावर ती अक्षरे प्रमाणबद्धच दिसायला हवीत. सरळ रेषा स्पष्ट आणि ठळक दिसायला हव्यात आणि वळणदार फराटे हे नाजूक, वेगवान आणि सहज दिसायला हवेत. इतकंच काय ब्रश शाईत किती बुडवायचा यावरही शोदोची अचूकता अवलंबून असते! या वर्णनावरून हा बराच वेळखाऊ प्रकार आहे असं वाटण्याची शक्यता आहे, पण शोदोतील

निष्णात मंडळी ब्रश लीलया, पाहिजे तसा वळवून काही मिनिटात सुंदर कॅलिग्राफी चितारतात.

शोदोमध्ये अक्षरांच्या वेगवेगळ्या शैली (styles) आहेत. तेन्शो (Seal), रेइशो (Clerical), काइशो (Regular), ग्योशो (Semi-cursive) आणि सोशो (Cursive). यापैकी ग्योशो आणि सोशो या वेगवान, अधिकाधिक लयबद्ध होत जाणाऱ्या शैली असून यामध्ये रेषांच्या गती व लयीला जास्त महत्त्व असल्याने त्या अक्षराची ठोस, रेषीय रचना पुसट होत जाते. ('सोशो' मध्ये 'सो' = गवत 'शो' = लिखाण म्हणजे थोडक्यात गवताच्या पात्यांसारखी हेलकावणारी, लयबद्ध अक्षरे!) याउलट तेन्शो किंवा काइशोमध्ये अक्षरातील सर्व रेषा सुस्पष्ट, छापल्याप्रमाणे (शिक्का मारल्यासारख्या) दिसतात. जपानी कॅलिग्राफी ही बहुतेक वेळेस जपानी वर्तमानपत्रांप्रमाणे उभी, उजवीकडून डावीकडे रचत नेतात. कधीकधी सुट्या, एखाद्याच शब्दाचीही कॅलिग्राफी असू शकते. खरं तर काय लिहावं, काय नाही याचे खास असे ठोकताळे नसतात, परंतु बहुतेक करून प्रेरणादायी, प्रोत्साहन देणारे तसेच आठवणी जागे करणारे, अंतर्मुख करायला लावणारे, सकारात्मक साहित्य; जपानी कविता (हायकू), गाणी, म्हणी, झेन सुविचार इ. शोदोच्या माध्यमातून लिहिले जातात. चिराशी-गाकी या प्रकारामध्ये, शाका नावाची 31 syllables असलेली एक पारंपरिक कविता अतिशय रंजक पद्धतीने लिहिली जाते. यात शोदोकार, एका चौकोनी कागदावर कवितेच्या ओळी वेगवेगळ्या पातळ्यांवर (levels) लिहिण्यास प्रारंभ करतो जेणेकरून त्या कवितेतल्या लयीच जणू त्या ओळींच्या माध्यमातून एखाद्या लहरीप्रमाणे जिवंत भासाव्यात! इतकंच काय, आवश्यकतेनुसार ठिकठिकाणी शाईच्या गडद/ठळक किंवा फिकट/पुसट छटांतून कवितेतील खोल आशय, शब्दांची उंची इत्यादी परिणामदेखील साधला जातो...

शोदोची तुलना बऱ्याचदा संगीतकाराने रचलेल्या लयींशी किंवा चित्रकाराच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रांशी केली जाते. अक्षरांचा अचूक मेळ साधत केलेल्या या सुलेखनात योग्य त्या ठिकाणी, योग्य तेव्हढीच मोकळी जागा सोडत साधलेला अक्षरांचा समतोल, शाईच्या गडद-फिकट छटेनुसार साधला जाणारा परिणाम या बाबींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जपानी कॅलिग्राफीतील महत्त्वाचे घटक (elements) म्हणजे रेषा, आकार आणि मोकळी जागा. 'निसर्ग' ही शोदोमध्ये सर्वात जास्त वापरली जाणारी संकल्पना आहे. ऋतू, झाडे, फुले, पाने इत्यादी नैसर्गिक घटक शोदोकारांचे आवडते विषय असतात. मानवी किंवा भौमितीय आकार यामध्ये बहुतेक दिसून येत नाहीत.

**शोदोमागील झेन विचार-**

झेन तत्त्वज्ञानानुसार खरी निर्मिती ही केवळ सरावातून साध्य होणारी गोष्ट नाही तर 'मु-शिन' म्हणजे 'मनाचे अस्तित्व नसलेल्या' अवस्थेत घडणारी गोष्ट आहे. मु-शिन अवस्था ही अशी अशी अवस्था असते की ज्यामध्ये विचार, भावना, अपेक्षा इत्यादी अस्तित्वातच नसतात. अशी अवस्था गाठल्यानंतर घडते ती खरी निर्मिती होय. खोल, गंभीर अर्थ सांगणारी अक्षरे झेन कॅलिग्राफीच्या माध्यमातून काढावयाची झाल्यास, त्या कलाकाराने सर्व काही विसरुन केवळ त्या अक्षरांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या भावार्थाशी एकरूप होणे आवश्यक असते. जपानी कॅलिग्राफी ही जपानी सुप्रसिद्ध टी-सेरीमनीचा एक अविभाज्य घटक आहे. झेन विचारानुसार, चहापानविधीच्या तयारीमध्ये शोदो वाचणे हे मनातील विचार काढून टाकून, मन नितळ करायची एक आवश्यक पायरी असते.

**आधुनिक जपानी कॅलिग्राफी (Contemporary calligraphy)**

पूर्वी मुख्यत्वे देवळांमध्ये किंवा जपानी घरातल्या शोकोनोमा (जपानी घरात आढळणारी इकेबानासारख्या कलात्मक निर्मिती दर्शविणारी जागा)मध्ये जपानी कॅलिग्राफी दिसायची. आता सगळीकडे दिसते. पाश्चात्य जगात जे स्थान छायाचित्रे किंवा चित्रांच्या तसबिरींना आहे, तेच आता शोदोच्या उत्कृष्ट नमुन्यांनादेखील आहे.

उत्तम सांस्कृतिक वारसा लाभलेल्या जपानचे कौतुक यासाठी वाटते की, इकेबाना किंवा शोदोसारख्या कला त्यांनी पिढ्यान् पिढ्या जपल्या आहेत. आजच्या तरुण पिढीनेही शालेय जीवनात शोदोचे धडे हे गिरवलेले असतातच हे विशेष! अर्थात, बदलत्या काळानुसार शोदो कलाकारांनाही पारंपरिक शोदो (Traditional calligraphy) नियमांच्या चौकटीबाहेर उडावेसे वाटले नाही तरच नवल! ठराविक कागद, ब्रश, ठरलेला काळा रंग, उभी-उजवीकडून डावीकडे लिहीत जाण्याची पद्धत यांसारख्या नियमांना छेद देत आजच्या शोदो कलाकारांनी आपलीशी केलेली पेनासारखी वेगळी माध्यमे (Pen calligraphy ), उठावदार पोत किंवा डिझाइन पॅटर्न्स असणारे कागद, कापड किंवा अन्य वस्तू आणि काळ्या रंगापेक्षा इतर रंग किंवा अगदी सोनेरी-चंदेरी रंगात केलेल्या कॅलिग्राफीचे नमुने रसिकांची निःसंशय दाद मिळवतात. कॅलिग्राफीचे विषयही निसर्गापुरते मर्यादित न ठेवता, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या मानवी भावभावना, विचार, वेगवेगळे मूड्स इ. विषयांनी शोदोमध्ये मुख्य स्थान पटकावलेले दिसते.

आमच्या कॅलिग्राफी वर्गातील एका रशियन विद्यार्थ्याचे उद्गार मला फार आवडले होते. तो म्हणाला, शोदो मला संगीताचेच दुसरे रूप वाटते. यातील कविता म्हणजे जणू एक musical score आहे आणि एखाद्या पियानोवादकासारखा शोदो कलाकार त्यातील प्रत्येक लयीचे त्याच्या परीने रसग्रहण करतो आणि अक्षरांद्वारे तिचे सुंदर सादरीकरण करतो! थोडक्यात काय, आता माझ्यासाठी एकसारखी दिसणारी, पांढऱ्यावरची काळी अक्षरे इतकीच जपानी कॅलिग्राफीची ओळख राहिली नाही, हे नक्की.

✉ varsha0714@yahoo.com



**झेन तत्त्वज्ञानानुसार खरी निर्मिती ही केवळ सरावातून साध्य होणारी गोष्ट नाही तर 'मु-शिन' म्हणजे 'मनाचे अस्तित्व नसलेल्या' अवस्थेत घडणारी गोष्ट आहे.**